कोल्हापूर : स्वामी विवेकानंद महाविद्यालयात 'सकाळ'तर्फे 'आय विल वोट' हा कार्यक्रम गुरुवारी झाला. या उपक्रमात सहभागी विद्यार्थी. शेजारी प्राचार्य प्रा. डॉ. एस. वाय. होनगेकर आदी.

सौरभ कुंभार : एक वेळ उमेदवार कमी शिकलेला असला तरी चालेल, पण तो गुन्हेगारी पार्श्वभूमीचा नको. कारण विकासासाठी सुरक्षित वातावरण आवश्यक असते. गुन्हेगारी पार्श्वभूमी असणाऱ्यांची सभागृहात संख्या वाढली, तर राज्यातील कायदा आणि सुव्यवस्था नीट राहणार नाही. विकासाचा दृष्टिकोन आणि सामाजिक प्रश्नांची जाण असणारा उमेदवार लोकांनी निवडावा.

सानिका हेबळे : डॉक्टर व्हायचे असल्यास एक अभ्यासक्रम आहे. त्याची स्वतंत्र महाविद्यालये आहेत. तसेच लोकप्रतिनिधी होण्यासाठी एखादा अभ्यासक्रम, विद्यापीठ असणे आवश्यक आहे. तसेच प्रत्येक खात्याचा मंत्री निवडताना त्या-त्या विषयातील तो तज्ज्ञ असला पाहिजे. यामुळे राजकारणाचा आणि सरकारचा दर्जा वाढेल.

जुबेरिया बाणदार : आरक्षणामुळे अनेकांवर गुणवत्ता असूनही अन्याय होतो. तसेच आरक्षणाचा लाभ काही अद्याप शेवटच्या वंचित घटकापर्यंत पोहचलेला नाही. त्यामुळे नोकरी आणि शिक्षण यामध्ये गुणवत्तेला संधी दिली गेली पाहिजे. आरक्षणाचा लाभ देताना गुणवत्तेवर अन्याय होणार नाही याची जबाबदारी सरकारची आहे. मात्र या मुद्द्यावर बोलायला एकही पक्ष तयार नाही.

अनिरुद्ध इंगळे : नोकरी, उद्योगांना लागणारे कर्ज, शैक्षणिक कर्ज, उच्च शिक्षणातील फी वाढ या मुद्द्यांवर कोणताच पक्ष आपली भूमिका मांडत नाही. प्रत्येकवेळी राजकीय आणि भावनिक मुद्देच प्रचारात पाहायला मिळतात. एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करायचे बंद करून युवा पिढीचे प्रश्न प्रचारात येणे आवश्यक आहे.

गीतांजली बारुलकर : निवडणूक काळात आचारसंहिता लागू होते; मात्र आचारसंहितेचे काटेकोर पालन होत नाही. मतदारांना खुलेआम दारू दिली जाते. निवडणुकीच्या काळात दारूबंदी केली जावी. तसेच मतदारांना आमिष दाखवण्याचा प्रकारही दिसतो. त्यामुळे निवडणुकीच्या आचारसंहितेची अंमलबजावणी काटेकोरपणे व्हावी.

गौरव मगदूम : सध्या सर्वत्र मंदीचे वातावरण आहे. कोल्हापुरातील कारखाने १६ दिवसच सुरू आहेत; मात्र हा मुद्दा प्रचारात नाही. सुदृढ अर्थव्यवस्था आणि प्रभावी औद्योगिक धोरण राजकीय पक्षांनी निवडणुकीत मांडले पाहिजे. यावर चर्चा केली पाहिजे. या अनुषंगाने प्रचार करणे आवश्यक आहे.

विकासाची संधी देणारी हवी व्यवस्था

महाविद्यालयीन तरुणाईचा निर्धार; प्रचारात युवकांचे प्रश्न नसल्याची खंत

मतदारांना मतदानासाठी प्रोत्साहित करण्यासाठी 'सकाळ'ने 'आय विल व्होट' हा उपक्रम हाती घेतला. या उपक्रमांतर्गत विविध महाविद्यालयांतील तरुणाईला मतदान करण्याचे आवाहन केले जात आहे. तसेच राजकारण आणि निवडणूक या विषयी त्यांचे मत काय? हे जाणून घेण्याचा प्रयत्न याद्वारे असतो. या निमित्ताने तरुणाई परखड मते मांडतेच आणि मतदानाचा निर्धारही व्यक्त करते. या उपक्रमाचे सकाळ-यंग इन्स्पिरेटर्सतर्फे आयोजन करण्यात आले.

राजकारण हा नेहमीच चर्चेचा विषय असतो. निवडणूक जवळ आली, की या चर्चेला उधाण येते. तरुणाई मात्र बऱ्याचवेळा या चर्चेपासून अलिप्त असते. असे असले तरी त्यांची राजकारण, निवडणूक, प्रचार याबद्दलची मते पक्की आणि परखड आहेत. प्रचलित व्यवस्था बदलून सर्वांना विकासाची संधी देणारी व्यवस्था असावी, असा तरुणाईचा इरादा आहे. मतदान हे यासाठी प्रभावी माध्यम असून मतदान नक्की करणार हा त्यांचा निर्धारही पक्का आहे. तरुणाईच्या राजकीय पक्ष आणि उमेदवारांकडून अनेक अपेक्षा आहेत.

राजकीय पक्षांनी सुशिक्षित, विकासाची दृष्टी असणारे आणि सामाजिक जाणीव बाळगणारे उमेदवार दिले पाहिजे, ही अपेक्षा तरुणाई ठेवत नाही. कारण त्यांना पक्षांच्या मर्यादा कळल्या आहेत. आचारसंहिता नावापुरतीच आहे. मतदारांना आमिष दाखवण्याचे प्रकार घडत आहेत, अशी खंतही तरुणाई व्यक्त करते. प्रचारातून जगण्यातील संघर्षाचे प्रतिबिंब उमटले पाहिजे. रोजगार, औद्योगिक धोरण, शिक्षण आणि महिला सुरक्षा हे मुद्देही प्रचारात येणे आवश्यक आहेत. पण, हे मुद्दे प्रचारात येत नाहीत. या मुद्द्यांवर सर्वच पक्ष मौन बाळगतात. हे सर्व जरी वास्तव असले, तरी परिवर्तन तरुणाईलाच करायचे आहे. त्यामुळे निवडणुकीकडे दुर्लक्ष न करता मतदान करून योग्य उमेदवार निवडणे हाच पर्याय आहे, अशी भावना तरुणाईने व्यक्त करत वैचारिकता दाखवून दिली.

सकाळ I WILL VOTE माझं मत माझा हक्क

YOUNG INSPIRATORS NETWORK
Inspire. Network. Deliver

वैष्णवी पिंगळे : सर्वसामान्य कुटुंबातील मुलांना गुणवत्तापूर्ण शिक्षण अल्पदरात उपलब्ध होईल, तेव्हाच खऱ्या अर्थाने देशाची प्रगती होईल. यासाठी शासकीय महाविद्यालयांची संख्या वाढवली पाहिजे. सध्या ज्याच्या जवळ पैसे त्यांनाच चांगले शिक्षण अशी स्थिती निर्माण झाली आहे. शासकीय शाळा, महाविद्यालयांची गुणवत्ता वाढवणेही आवश्यक आहे. हे मुद्दे प्रचारात कधीच नसतात.